Tender 1

# जालना शहर महानगरपालिका, जालना

प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड, जुना जालना- 431203, कार्यालय संपर्क क्र. (02482)-230350
Email ID- comcjalna@gmail.com Website-jalnamahaulb.maharashtra.gov.in

विभागः पा. पु. जा.क्र./ जाशमनपा / 242 दिनांकः 14 / 11 /2025

## ई-निविदा सुचना

या ई-निविदाद्वारे पाणी पुरवठा विभाग, जालना मनपा करीता खालीलप्रमाणे नमुद केलेल्या कामांचेसन 2025-26या वित्तिय वर्षाकरीता म.न.पा. निधीअंतर्गत दर पध्दतीने निश्चित करणेसाठी नक्कल वृत्तांत ठराव क्रं. 549 दिनांक 21/03/2025च्या अधिन राहुन खालीलप्रमाणे कामे करणेकरिता कंत्राटदाराकडुन ऑनलाईन पध्दतीने ई-निविदाद्वारे दरपत्रक मागविण्यात येत आहे. सर्व निविदा धारकांनी आपली ई-निविदा/दरपत्रके www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर दिनांक 17 / 11 /2025 ते दिनांक 01 / 12/2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत भरण्यात यावे. सदरील ई-निविदा दिनांक 02/12/2025 रोजी (शक्य झाल्यास) सायंकाळी ठिक 5.00 वा. महानगरपालिका कार्यालयात निविदा समिती व ठेकेदार त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

तरी सदर कामासाठी दिलेल्या अटी व शर्तीनुसार ईच्छुकांनी आपल्या कागदपत्रांची पुर्तता व ईसारा रक्कम आणि अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने करणे आवश्यक आहे. कोणतेही ई-निविदा मंजुर करणे अथवा नाकारणे बाबतचा अधिकार जालना महानगरपालिका,जालनाने राखुन ठेवलेला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | दर | बयाना रक्कम (EMD1%) | सुरक्षित ठेव रक्कम (2%) | निविदा फिस | कामाची मुदत (महीने) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1. | पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेले ॲलम(तुरटी) ग्रेड-1पुरवठा करणे. | प्रति टन | 1,00,000/- | 2,00,000/- | 3600/- | 12 महिने |
| 2. | पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेले विरंजन चुर्ण (ब्लिचिंग पावडर) ग्रेड-1 पुरवठा करणे. | प्रति टन | 1,00,000/- | 2,00,000/- | 3600/- | 12 महिने |
| 3. | पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेले क्लोरिंन टर्नरचा पुरवठा करणे. | प्रति टन | 20,000/- | 40,000/- | 3600/- | 12 महिने |

**अटी व शर्ती:**

१. निविदा धारकास सदरील ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्तळावरुन भरणे बंधनकारक असेल. निविदा धारकाने खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

A) EPF/ESIC नोंदणी प्रमाणपत्र व भरणा केलेल्या चलनांच्या प्रती.

B) GST नोंदणी प्रमाणपत्र व जीएसटी भरणा केल्याबाबतची चलने.

C) Pan Card

Scanned with OKEN Scanner

D) I.T.R. आर्थिक वर्ष 2022-23, 2023-24, 2024-25 चे I.T.R दाखले केल्याचा तपशील, सनदी लेखापालाने UDIN सह प्रमाणित केलेले आर्थिक ताळेबंद विवरणपत्रे

E) Turnover प्रमाणपत्र (सालसन 2022-23, 2023-24, 2024-25 या तीन आर्थिक वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल ही रु. 01 कोटीपेक्षा कमी नसावी.)

F) संस्था नोंदणी प्रमाणपत्र

G) बँक खात्यातुन ऑनलाईन EMD भरणा केल्याची प्रत.

H) उद्यम आधार नोंदणी प्रमाणपत्र.

I) MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.

२. निविदेमध्ये समाविष्ठ असलेल्या साहित्याचा पुरवठा किमान 03 वर्षे केला असल्याबाबतचा अनुभव आवश्यक आहे.

३. निविदामधील पदाधीकारी/कर्मचारी यांचा सहभाग नसलेबाबतचे रु. ५००/- च्या प्रतिज्ञापत्र

४. संस्थेविरुदध कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याबाबत,काळया यादीमध्ये नाव नसल्याबाबत रु. ५००/- प्रतिज्ञापत्र

५. मंजुर निविदा धारकास योग्य त्या स्टॅंमवर करारपत्र व प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक राहील.

६. सदर निविदा प्रक्रिया ही महाराष्ट्र शासनाच्या ई-खरेदी धोरण २०१६ व मनपा अधिनियमच्या कलम ७३-C नुसार राबविली जाईल.

७. Pre-Bid बैठक दिनांक १९ / ११ /२०२५ रोजी आयोजित करण्यात आली असुन याकरिता श्री. राजेश बगळे, अभियंता, पा.पु. विभाग मो. क्र. ९८५०१९६४७८ यांच्याशी संपर्क साधावा.

८. पुरवठा करण्यात येणारी तुरटी (IS 260), विरंजन चुर्ण (IS 1065), क्लोरीन टर्नर (IS 646) मानांकने असावीत.

९. अॅलम, ब्लिचींग व क्लोरीन टर्नरचा पुरवठा करण्याकरिता उत्पादनकर्ता अथवा अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१०. Joint Ventures/Consortiums असणारे निविदाधारक पात्र असणार नाही.

११. पुरवठा करण्यात येणा-याचा साहित्याचा मागणी केल्यानंतर ०३ दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१२. दिलेले काम करणेबाबत म.न.पा. जालनाचे अधिकारी वत्यांचे प्रतिनिधी ज्या-ज्या सुचना देतील त्याची अंमलबजावणी कंत्राटदारास करणे बंधनकारक राहील.

१३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावे.

१४. सदर कामाची Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

१५. Commercial Bid उघडणेच्या दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

१६. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करावेत.

१७. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, बाराई, हमाली वगैरे सर्व खर्चासह मनपामध्ये पोहोचची वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करावा व ऑनलाईन दर भरताना सर्व खचांसह दर भरावेत.

१८. शासन नियमानुसार सध्या लागू असलेले व वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बोलावून कपात करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

१९. पुरवठादाराने online निविदेत दर भरतांना काळजी पुर्वक भरावेत नजरचुकीने दर भरले आहेत अशा सबबी पुरवठा आदेश दिलेनंतर विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२०. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथमः उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उपडण्यात येतील.

२१. कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

२२. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत सदर साहीत्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून मनपाकडे ठेवावी लागेल.

२३. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल, ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर साहित्याचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही.

२४. ई-निविदेतील एजन्सीने वर्णनाप्रमाणेच साहित्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

२५. मंजूर झालेल्या दराने साहित्याचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील, मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही.

२६. पुरवठा केलेल्या साहित्याच्या पावडरचे नमुने शासकीय अथवा शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करुन, तिचा त्याचा दर्जा व परीमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच बीलाची रक्कम अदा करण्यात येईल. अहवालामध्ये मालाच्या घटकामधील प्रमाण विहीत स्टॅण्डर्ड प्रमाणापेक्षा कमी आढळल्यास पाणी पुरवठा विभागामार्फत त्या प्रमाणात दर कमी करण्यात येईल. सदर साहित्याचे बील अदा करतांना जास्तीत जास्त २०% पर्यंत कपात करण्यात येईल किंवा पुरवठा केलेले साहित्य घेण्यास नकार देण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. असा वाद निर्माण झाल्यास पुरवठादारास ०७ दिवसांच्या आत पुर्नचाचणी करुन अहवाल सादर करता येईल.

२७. पुरविलेल्या साहित्याचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची संबंधित विभागाची खात्री झाल्यावरच त्यांचे अभिप्रायनुसार अदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२८. बील मनपाकडे सादर केलेपासून साहित्याची लॅब तपासणी अहवाल प्राप्त झालेनंतर ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला अदा करण्याचा मनपाचा प्रयत्न राहिल. मनपाकडुन कुठलाही खर्च वेगळा दिला जाणार नाही.

२९. पुरवठाधारकाने पुरविलेले साहित्य मनपाने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी मनपाला बाजारभावाने दुसरीकडून साहित्य खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा मनपाकडून देय असलेल्या इतर बिलातुन केली जाईल.

३०. शासन नियमानुसार कर कपाती बिलातून करण्यात येतील.

३१. साहित्याची मागणी दुरध्वनीवरून कळविल्यानुसार वेळेत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास मनपाची अडचण होऊ नये म्हणून, मनपाला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके साहित्य बाजारातून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या साहित्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने मनपाला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार मनपाला राहील.

३२. निविदेतील मागणी/ वर्णनाप्रमाणे व मंजुर दराने साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा साहित्य पुरवठा न केल्यास मनपाला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करून साहित्य खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई

Scanned with OKEN Scanner

पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत मनपाच्या निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

३३.निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) सदर काम करु शकला नाही व तसे कंत्राटदाराने मनपाला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त सदरचे काम करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. कंत्राटदाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजूर दराने काम करणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने सदरचे काम न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल याबाबत मनपा जो निर्णय घेतील तो कंत्राटदाराला बंधनकारक राहील, याबाबत कंत्राटदाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

३४. पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच मनपाने नमूद केलेले कुठल्याही अटी-शतीचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत मनपा आयुक्त जो निर्णय घेतील तो आपणांवर बंधनकारक व अंतीम राहील. याबाबत पुरवठाधारकाची काहीही तक्रार चालणार नाही. काही आक्षेप असल्यास जालना न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातच निपटारा करण्यात येईल.

३५. कोणतीही निविदा अंशतः पूर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क मनपाने राखून ठेवलेला आहे. सदर निविदेतील नमूद अटी-शती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

३६. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार मनपाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी मनपावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत

३७. निविदाधारकाने पुरविलेल्या कर्मचा-यांना (कामाच्या कालावधीपर्यंत) विमा संरक्षण द्यावे लागेल. नसता वर्क मेन्स कार्पोरेशन कायद्याप्रमाणे दुखापत होवुन मयत झाल्यास योग्य तो मोबदला द्यावा लागेल. (As per rule 81, महाराष्ट्र कारखाना नियम १९६३ नुसार)

३८. सदरचे काम नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्याने कोणत्याही परिस्थितीत मा.आयुक्तांच्या पूर्वपरवानगी शिवाय काम बंद करता येणार नाही.

३९. दरपत्रकधारकाने दिलेल्या दरपत्रकात नमुद केलेल्या साहित्य केलेल्या साहित्याचे उत्पादन नामांकित कंपनी असावी.

४०.पुरवठा करण्यात आलेले सामुग्रीची शासकीय प्रयोगशाळेत (राज्य जल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा, जालना/छत्रपती संभाजीनगर किंवा कोणत्याही महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाची मान्यता दिलेली प्रयोगशाळा) तपासणी करुन त्याचा अहवाल विहीत गुणवत्ता मानकानुसार सादर केल्याशिवाय देयक अदायी केली जाणार नाही.

४१. पुरवठा करावयाचे सर्व साहित्य जलशुध्दीकरण केंद्र, म.न.पा. जालना व अंबड जलशुदधीकरण केंद्र,अग्रसेन चौक जालना येथे वाहतुक व हमाली खर्चा सह पोहोच करावे.

४२. साहित्याच्या संख्येत वाढ किंवा घट करण्याचे अधिकार या कार्यालयास राहील.

४३. दरपत्रकधारकास त्याचे दरपत्रकातील दर हे कामाच्या आदेशामध्ये नमुद केलेल्या कालावधी पर्यंत लागु राहतील.

४४. दरपत्रका सोबत निविदा शुल्क व इसारा रक्कम जमा केल्याची पावती सोबत जोडावी लागेल.

४५. पुरवठा करण्यात येणा-या साहित्या वर आवश्यक त्या ठिकाणी व गरजे नुसार विविध विभागांचे नांव लिहून व रंग करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

४६. सदर साहित्य पुरवठा करीताचा निधी हा म.न.पा. निधी मधुन प्रस्तावित असुन साहित्य पुरवठा झाल्यानंतर सदर चे देयकास निधी उपलब्ध झाल्यानंतरच बिलाची अदाई करण्यात येईल व सदर बाबत कोणतेही व्याज देय राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

४७. कंत्राटदारांनी पुरवठा केलेल्या साहित्यांची नोंदवही ठेवणे आवश्यक असुन देयक सादर करतेवेळी त्याची प्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे तसेच आवश्यकतेनुसार जिओ टॅग फोटो जोडणे आवश्यक आहे.

४८. साहित्याचा पुरवठा करण्यामध्ये विलंब झाल्यास आवश्यकतेनुसार शास्ती लावण्यात येईल.

४९. उक्त अटी व शर्ती च्या अधिन राहुन दरपत्रकधारकांनी आपले दरपत्रके दाखल करावी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **शहर अभियंता (पा.पु.)** | **सहायक आयुक्त** | **मुख्य लेखाधिकारी** | **उप आयुक्त** | **अतिरिक्त आयुक्त** | **आयुक्त तथा प्रशासक** |
| जालना शहर मनपा | जालना शहर मनपा | जालना शहर मनपा | जालना शहर मनपा | जालना शहर मनपा | जालना शहर मनपा |

Scanned with OKEN Scanner